# गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापकांचा माहिती प्राप्त करणे व वापर या संबंधित विविध घटकांचा चिकित्यक अभ्यास

**श्री. विनोद प्र. पत्तीवार**
संशोधक विद्यार्थी
ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**डॉ. अनिल ए. भोयर**
ग्रंथपाल
गोविनंदराव मुनघाटे कला विज्ञान महाविद्यालय, कुरखेडा

---

**सार :**

प्रस्तुत संशोधनकार्यात गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत विज्ञान महाविद्यालयात कार्यरत प्राध्यापकांचा माहिती प्राप्त करणे व वापर या संबंधित विविध घटकांचा चिकित्यक अभ्यास करण्यात आला. संशोधनाकरिता गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित विज्ञान महाविद्यालयात कार्यरत प्राध्यापकांची सर्वेक्षण पद्धतीद्वारे निवड करण्यात आली व प्रश्नावलीच्या माध्यमानी त्यांच्याकडून माहिती प्राप्त करण्यात आली. संशोधनात प्राप्त परिणाम दर्शवितात की बहुतांश प्राध्यापक माहिती प्राप्त करण्याकरिता ईलेक्ट्रानिक साधनांना प्राधान्य देतात व विविध कार्याकरीता माहिती प्राप्त करण्याकरिता कार्य पूर्ण होईपर्यंत ग्रंथालयात वेळ घालवतात. बहुतांश प्राध्यापकांना संशोधन कार्याकरिता व कार्यशाळा/ चर्चासत्राकरिता नेहमीच ग्रंथालयातुन माहितीची आवश्यकता पडते.

**बीज संज्ञा :**

प्रस्तावना, संशोधन पद्धती, संशोधनाचे कार्यक्षेत्र, अध्ययन विश्व व जनसंख्या,नमुना निवड व न्यादर्श, संशोधन आराखडा, तथ्य संकलन - संशोधनाची साधने, सांख्यकिय विश्लेषण, माहितीचे विश्लेषण व निर्वचन, ग्रंथालयात घालवण्यात येणारा वेळ, माहिती प्राप्त करण्याकरिता प्राधान्य देण्यात येणारी साधने,विविध कार्याकरीता माहितीच्या आवश्यकतेची वारंवारीता, वर्गाचे व्याख्यान तयार करणे, विद्यार्थ्यांच्या शंका निरसनाकरीता, संशोधन कार्याकरीता माहितीची आवश्यकता, कार्यशाळा/ चर्चासत्राकरीता माहितीची आवश्यकता,निष्कर्श,संदर्भ.

---

## 1.0 प्रस्तावना :

आज माहिती ही सर्वांच्या निकडीची बाब बनली आहे. माहितीचा उपयोग करणारे गरजू उपभोक्ते असतात. संशोधक, व्यावसायिक किंवा समाजातील इतर घटकांना कोणत्या तरी गोष्टीविशयी सातत्याने आधुनिक, प्रचलित किंवा ऐतिहासिक स्वरूपातील माहिती हवी असते. या उपलब्ध माहितीच्या आधारेच परत नव्या माहितीची उत्पत्ती होत असते. माहिती हा जसा प्रत्येक मानवी मनातील घटक आहे, त्याचप्रमाणे तो जगातीलही अत्यंत महत्वाचा घटक आहे. अनेक शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञाच्या बैठकीतून, परिषदांमधून त्यांच्या व्यावहारिक उपयोगातील समस्येसाठी प्रचलित माहिती गोळा करतात किंवा संग्रहित करतात. त्याचप्रमाणे

कोणत्याही ग्रंथालयाचे तीन घटक असतात ते म्हणजे प्रलेख, वाचक आणि ग्रंथपाल, प्रलेख म्हणजे छापील, हस्तलिखित, ज्याला आपण साहित्य म्हणतो, मग ते पुस्तक असेल, नियतकालिक असेल, छायाचित्रे असतील, ध्वनिफित असतील, चित्रफिती असतील, या सर्व आधुनिक तसेच पारंपरिक साहित्याची योग्य ज्ञानसाधकाशी आणि ज्ञानसाधकाची त्याला अपेक्षित असलेल्या साहित्याशी भेट घडवून आणणे हेच ग्रंथालयाचे मुख्य कार्य आहे. आज माहिती ही सर्व सामाजिक घटकांची आवश्यक बाब झाली आहे. माहिती निर्मितीच्या क्षेत्रात समाजातील वैयक्तिक घटक तसेच विविध संस्था यांचा सहभाग असतो. जसे, शिक्षण संस्था, विद्यापीठे, संशोधन व विकास संस्था यांच्यामार्फत होणारे संशोधन अथवा प्रगत अभ्यासामुळे नवीन माहिती

व ज्ञानाचा विकास होतो. ही माहिती छापील स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे ग्रंथालयांच्या माध्यमातुन वितरीत केली जाते.

प्राध्यापकांना विविध स्वरूपाच्या माहितीची आवश्यकता असते. प्राध्यापकांना माहिती ही त्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी हवी असते. प्राध्यापकांच्या माहितीविषयक गरजांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की प्राध्यापक हे साधारणतः आपल्या विविध प्रकारच्या कार्यासाठी माहितीची मागणी करतात. तसेच, माहितीशोध तंत्रांचा योग्य वापर करून डिजिटल स्वरूपातील माहिती शोधाची प्रक्रिया अत्यंत जलद गतीने करतात. वाचक विशिष्ट उद्देशाने ग्रंथालयात येतो तेव्हा त्याच्याकरिता वेगवेगळ्या स्वरूपात वाङ्मयशोध ग्रंथपाल अथवा संदर्भ ग्रंथपाल किंवा माहिती अधिकाऱ्यांना करावा लागतो. वाचकांच्या वाचन साधने व माहितीविषयक गरजांचे स्वरूप काय आहे त्या अनुषंगाने वाङ्मयशोध केला जातो. वरील सर्व बाबींचा सखोल विचार करून प्रस्तुत संषोधनकार्यात गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत विज्ञान महाविद्यालयात कार्यरत प्राध्यापकांचा माहिती प्राप्त करणे व वापर या संबंधित विविध घटकांचा चिकित्यक अभ्यास करण्यात आला आहे.

**2.0 संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनकार्यात निर्दोश माहिती मिळण्यासाठी सर्वेक्षण व विश्लेषण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. प्रस्तुत संशोधनकार्यात गुगल फॉर्मद्वारे सर्वेक्षण करून तथ्य संकलन करण्यात आले.

**2.1 संशोधनाचे कार्यक्षेत्र :**

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणुन गडचिरोली विद्यापीठाअंतर्गत येणा-या सर्व क्षेत्राची निवड केली.

**2.2 अध्ययन विश्व व जनसंख्या :**

प्रस्तूत अध्ययनात गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत संलग्नित विज्ञान महाविद्यालयांतील सर्व प्रध्यापकांचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला. तसेच, या शैक्षणिक महाविद्यालयात कार्यरत सर्व प्रध्यापकांचा विचार जनसंख्येत करण्यात आला.

**2.3 नमुना निवड व न्यादर्श :**

प्रस्तुत संशोधनकार्या अध्ययनाकरीता रॅन्डमसॅम्पलींग पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. एकुण 114 प्रध्यापकांची माहिती संकलनासाठी न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

**2.4 संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संषोधनात वर्णनात्मक संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे.

**2.5 तथ्य संकलन - संशोधनाची साधने :**

प्रस्तुत अध्ययनात माहिती संकलित करण्याकरिता प्रमाणीकृत पद्धतीचा व प्रश्नावलीचा उपयोग करण्यात आला. अध्ययनाच्या उद्दिष्टांना अनुसरून व वापर करून प्रश्नावली तयार करण्यात आली संशोधनकऱ्याने प्रध्यापकांकडून प्रश्नावली गुगल फॉर्मच्या माध्यमातुन भरुन घेतली.

**2.6 सांख्यकिय विश्लेषण :**

प्रस्तुत संशोधनकार्यात प्राप्त झालेल्या माहितीचे सांख्यकिय विश्लेषण करण्यात आले. प्राप्त माहितीवरुन वारंवारीता व बहुलक काढण्यात आले व माहितीच्या पुढील विश्लेषणाकरीता काई वर्ग मुल्य चाचणीचा वापर करण्यात आला. संभाव्यता पातळी 0.05 निर्धारीत करण्यात आली.

**3.0 माहितीचे विश्लेषण व निर्वचन :**

3.1 माहिती मिळविण्याकरीता महाविद्यालयातील ग्रंथालयाला किती वेळा भेट देता

सारणी क्र. 1 माहिती मिळविण्याकरीता प्राध्यापकांद्वारे महाविद्यालयातील ग्रंथालयाला भेट देण्याची वारंवारिता याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| ग्रंथालय भेट वारंवारीता | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| दररोज | 17 | 14.9 |
| आठवडयात एकदा | 51 | 44.7 |
| आठवडयात दोनदा | 24 | 21.1 |
| महिन्यात एकदा | 13 | 11.4 |
| क्वचितच | 9 | 7.9 |
| एकूण | 114 | 100.00 |

काई-वर्गमूल्यः 48.982य स्वातंत्र्यांश4; Pमुल्य0.5 तालिका मूल्यः9.49

वरील सारणी क्रमांक1 मध्ये माहिती मिळविण्याकरीता प्राध्यापकांद्वारे महाविद्यालयातील ग्रंथालयाला भेट देण्याची वारंवारिता दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार 14.9 टक्के उत्तरदाते दररोज ग्रंथालयाला भेट देत असून 44.7 टक्के उत्तरदाते माहिती मिळविण्याकरिता आठवडयात एकदा ग्रंथालयाला भेट देत असल्याचे आढळले. तसेच 21.1 टक्के व 11.4 टक्के अनुक्रमे उत्तरदाते माहिती मिळविण्याकरिता आठवडयात दोनदा व महिन्यात एकदा ग्रंथायलाला भेट देत असून 7.9 टक्के उत्तरदाते क्वचितच ग्रंथायलाला भेट देत असल्याचे आढळले.

**3.2 ग्रंथालयात घालवण्यात येणारा वेळ :**

सारणी क्र. 2: प्राध्यापकांद्वारे ग्रंथालयात घालवण्यात येणारे तास याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| ग्रंथालयात घालवण्यात येणारा वेळ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| एक तासापेक्षा कमी | 17 | 14.9 |
| एक ते दोन तास | 15 | 13.2 |
| दोन ते तीन तास | 33 | 28.9 |
| कार्य पूर्ण होईपर्यंत | 49 | 43.0 |
| एकूण | 114 | 43.0 |

काई-वर्गमूल्यः 26.491य स्वातंत्र्यांश3 pमुल्य <0.05 तालिका मूल्यः7.82

वरील सारणी क्रमांक 2 मध्ये प्राध्यापकांद्वारे ग्रंथालयात घालवण्यात येणारे तास याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार 14.9 टक्के उत्तरदाते ग्रंथालयालयात 1 तासापेक्षा कमी वेळ घालवत असून 13.2 टक्के उत्तरदाते ग्रंथालयात एक ते दोन तास घालवत असल्याचे आढळले. तसेच 28.9 टक्के उत्तरदाते ग्रंथालयात दोन ते तीन तास घालवत असून 43.0 टक्के उत्तरदाते कार्य पूर्ण होईपर्यंत ग्रंथालयात वेळ घालवत असल्याचे आढळले.

**3.3 माहिती प्राप्त करण्याकरिता प्राधान्य देण्यात येणारी साधने :**

सारणी क्र. 3: प्राध्यापकांद्वारे माहिती प्राप्त करण्याकरिता प्राधान्य देण्यात येणारी साधने याबाबत **माहिती दर्शविणारी सारणी**

| **माहितीची साधने** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| ईलेक्ट्रानिक | 48 | 42.1 |
| पारंपारिक माहिती साधन | 31 | 27.2 |
| अपरांपारिक साधन | 6 | 5.3 |
| वरील सर्व | 29 | 25.4 |
| एकूण | 114 | 100.00 |

काई-वर्गमूल्यः 34.351य स्वातंत्र्यांश3; मूल्य 0.05य तालिका मूल्यः7.82

वरील सारणी क्रमांक3 मध्ये प्राध्यापकांद्वारे माहिती प्राप्त करण्याकरिता प्राधान्य देण्यात येणारी साधने याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार 42.1 टक्के उत्तरदाते माहिती प्राप्त करण्याकरिता ईलेक्ट्रानिक साधनांना प्राधान्य देत असून 27.2 टक्के उत्तरदाते माहिती प्राप्त करण्याकरिता पारंपारिक माहिती साधनांना प्राधान्य देत असल्याचे आढळले. तसेच 5.3 टक्के उत्तरदाते माहिती प्राप्त करण्याकरिता अपारंपारिक साधनांना प्राधान्य देत असून 25.4 टक्के उत्तरदाते माहिती प्राप्त करण्याकरिता सर्व प्रकारचे साधनांना प्राधान्य देत असल्याचे आढळले.

### 3.4 विविध कार्याकरीता माहितीच्या आवश्यकतेची वारंवारीता :

#### 3.4.1 वर्गाचे व्याख्यान तयार करणे :

सारणी क्र. 4.: प्राध्यापकांना वर्गाचे व्याख्यान तयार करण्याकरिता माहितीच्या आवश्यकतेची **वारंवारीता दर्शविणारी सारणी**

| **माहितीची आवश्यकता** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| नेहमीच | 16 | 14.0 |
| कधी कधी | 64 | 56.1 |
| क्वचितच | 34 | 29.8 |
| एकूण | 114 | 100.00 |

काई-वर्गमूल्यः 30.947य स्वातंत्र्यांशः2; मुल्य 0.5 तालिका मूल्यः5.99

वरील सारणी क्रमाक 4 मध्ये प्राध्यापकांना वर्गाचे व्याख्यान तयार करण्याकरिता माहितीच्या आवश्यकतेची वारंवारीता दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार 14.0 टक्के उत्तरदात्यांना वर्गाचे व्याख्यान तयार करण्याकरिता नेहमीच माहितीची आवश्यकता पडतअसून 56.1 टक्के उत्तरदात्यांना कधी कधी माहितीची आवश्यकता पडत असल्याचे आढळले. तसेच 29.8 टक्के उत्तरदात्यांना वर्गाचे व्याख्यान तयार करण्याकरिता क्वचितच माहितीची आवश्यकता पडत असल्याचे आढळले.

#### 3.4.2 विद्यार्थ्यांच्या शंका निरसनाकरीता :

सारणी क्र. 5: प्राध्यापकांना विद्यार्थ्यांच्या शंका निरसनाकरिता माहितीच्या आवश्यकतेची वारंवारीता दर्शविणारी सारणी

| माहितीची आवश्यकता | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| नेहमीच | 9 | 7.9 |
| कधी कधी | 33 | 28.9 |
| क्वचितच | 72 | 63.2 |
| एकूण | 114 | 100.00 |

काई-वर्गमूल्यः 53.211य स्वातंत्र्यांश:2; मूल्य 0.5 तालिका मूल्य:5.99

वरील सारणी क्रमांक 5 मध्ये प्राध्यापकांना विद्यार्थ्यांच्या शंका निरसनाकरिता माहितीच्या आवश्यकतेची वारंवारीता दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार 7.9 टक्के उत्तरदात्यांना विद्यार्थ्यांच्या शंका निरसनाकरिता नेहमीच माहितीची आवश्यकता पडत असून 28.9 टक्के उत्तरदात्यांना कधी कधी माहितीची आवश्यकता पडत असल्याचे आढळले. तसेच 63.2 टक्के उत्तरदात्यांना विद्यार्थ्यांच्या शंका निरसनाकरिता क्वचितच माहितीची आवश्यकता पडत असल्याचे आढळले.

**3.4.3 संशोधन कार्याकरीता माहितीची आवश्यकता :**

सारणी क्र. 6: प्राध्यापकांना संशोधन कार्याकरिता माहितीच्या आवश्यकतेची वारंवारीता दर्शविणारी सारणी

| माहितीची आवश्यकता | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| नेहमीच | 66 | 57.9 |
| कधी कधी | 39 | 34.2 |
| क्वचितच | 9 | 7.9 |
| एकूण | 114 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 42.789 स्वातंत्र्यांश2; मुल्य0.5 तालिका मूल्य:5.99

वरील सारणी क्रमांक 6 मध्ये प्राध्यापकांना संशोधन कार्याकरिता माहितीच्या आवश्यकतेची वारंवारीता दर्शविण्यातआली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार 57.9 टक्के उत्तरदात्यांना संशोधन कार्याकरिता नेहमीच माहितीची आवश्यकता पडत असून 34.2 टक्के उत्तरदात्यांना कधी कधी माहितीची आवश्यकता पडत असल्याचे आढळले. तसेच 7.9 टक्के उत्तरदात्यांना संशोधन कार्याकरिता क्वचितच माहितीची आवश्यकता पडत असल्याचे आढळले.

**3.4.4 कार्यशाळा/ चर्चासत्राकरीता माहितीची आवश्यकता**

सारणी क्र. 7.: प्राध्यापकांना कार्यशाळा/ चर्चासत्राकरिता माहितीच्या आवश्यकतेची वारंवारीता दर्शविणारी सारणी

| माहितीची आवश्यकता | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| नेहमीच | 57 | 50.0 |
| कधी कधी | 41 | 36.0 |
| क्वचितच | 16 | 14.0 |
| एकूण | 114 | 100.0 |

काई-वर्गमूल्यः 22.474य स्वातंत्र्यांश :2; मूल्य 0.5 तालिका मूल्यः5.99

वरील सारणी क्रमांक 7 मध्ये प्राध्यापकांना कार्यशाळा/चर्चासत्राकरिता माहितीच्या आवश्यकतेची वारंवारीता दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार 50.0 टक्के उत्तरदात्यांना कार्यशाळा/ चर्चासत्राकरिता नेहमीच माहितीची आवश्यकता पडत असून 36.0 टक्के उत्तरदात्यांना कधी कधी माहितीची आवश्यकता पडत असल्याचे आढळले. तसेच 14.0 टक्के उत्तरदात्यांना कार्यशाळा/ चर्चासत्राकरिता क्वचितच माहितीची आवश्यकता पडत असल्याचे आढळले.

## 4.0 निष्कर्श :

### 4.1 प्राध्यापकांद्वारे महाविद्यालयातील ग्रंथालयाला भेट देणे :

- प्राप्त माहितीवरून असे निदर्शनास येते की माहिती मिळविण्याकरीता (0.05) बहुतांश प्राध्यापक आठवडयात एकदा ग्रंथालयाला भेट देतात.

### 4.2 ग्रंथालयात घालवण्यात येणारा वेळ :

- प्राप्त माहितीवरून असे निदर्षनास येते की माहिती मिळविण्याकरीता (0.05) बहुतांश प्राध्यापक कार्य पूर्ण होईपर्यंत ग्रंथालयात वेळ घालवतात.

### 4.3 माहिती प्राप्त करण्याकरिता प्राधान्य देण्यात येणारी साधने :

- प्राप्त माहितीवरून असे निदर्षनास येते की माहिती मिळविण्याकरीता (0.05) बहुतांश प्राध्यापक माहिती प्राप्त करण्याकरिता ईलेक्ट्रानिक साधनांना प्राधान्य देतात.

### 4.4 विविध कार्याकरीता माहितीच्या आवश्यकतेची वारंवारीता :

#### 4.4.1 वर्गाचे व्याख्यान तयार करणे :

- प्राप्त माहितीवरून असे निदर्शनास येते की (0.05) बहुतांश प्राध्यापकांना वर्गाचे व्याख्यान तयार करण्याकरिता कधी कधी माहितीची आवश्यकता पडते.

#### 4.4.2 विद्यार्थ्यांचीशंका निरसनाकरीता :

- प्राप्त माहितीवरून असे निदर्शनास येते की (0.05) बहुतांशविद्यार्थ्यांच्याशंका निरसनाकरिता क्वचितच माहितीची आवष्यकता पडते.

#### 4.4.3 संशोधन कार्याकरीता माहितीची आवश्यकता :

- प्राप्त माहितीवरून असे निदर्शनास येते की (0.05) बहुतांश प्राध्यापकांना संषोधन कार्याकरिता नेहमीच माहितीची आवष्यकता पडते.

#### 4.4.4 कार्यशाळा/ चर्चासत्राकरीता माहितीची आवश्यकता :

- प्राप्त माहितीवरून असे निदर्शनास येते की (0.05) बहुतांश प्राध्यापकांना कार्यशाळा/ चर्चासत्राकरिता नेहमीच माहितीची आवश्यकता पडते.

**5.0 संदर्भ सुची :**


- करमरकर प्रकाष, ग्रंथालयीन संदर्भसेवा, युनिव्हर्सल प्रकाषन, पुणे, 2012 पान क्र. 1.
- लेले व.वि. समग्र ग्रंथालय आणि माहितीशास्त्र, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 2015 पृश्ठ 333.
- कंहाडे डॉ बी.एम., 'शास्त्रीय संशोधन पद्धती', पिंपळापूरे अॅण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर 2007.
- स्टुअर्ट चैस., गुरूनाथ नालगोंडे, सामाजिक संशोधन पद्धती, कोल्हापूर, फडके प्रकाशन 1986:22
- डॉ. भोयर, अनिल (२०१७) : आदिवासी क्षेत्रातील सार्वजनिक ग्रंथालये :एक अभ्यास ,औरंगाबाद ,ग्रंथालय आणि माहितीशास्त्र प्रबोधिनी ,2017:प्रथम आवृत्ती.
- Adeoye, Oladele, M and Popoola, S. O. (2011). Teaching Effectiveness, Availability, Accessibility, and Use of Library and Information Resources Among Teaching Staff of Schools of Nursing in Osun and Oyo State, Nigeria, Library Philosophy and Practice (e-journal), 525, https://digitalcommons.unl.edu/libphilprac/525
- Afshari, M., Bakar, K. A., Luan, W. S., Samah, B.A and Fooi, F. S. (2009).Factors Affecting Teachers' Use of Information And Communication Technology, International Journal of Instruction, 2(1), pp. 77-104.
- Ingen, S., Ariew, L. S. (2022). How the questions of prospective teachers evolve when linking research to practice, Teaching and Teacher Education, 109, 103539.
- Pathan, F and Anandhalli, G. (2019). Information Literacy Competence and Skills Among Faculty Members of Blde And Secab Engineering Colleges In Vijayapura, *International Journal of Library & Information Science (IJLIS*), 8(1), pp. 1-14.
- Raja, J and Selvam, J. (2019). Awareness of Information Needs and Information Seeking Behaviour of Public Library Users in Thanjavur District: A Study, Singaporean Journal of Scientific Research(SJSR), 11(1), pp. 6-16
- Srinivasulu, P., ChinnaBalu, C and Narendra, A. (2019). Awareness and Usage of e-resources by faculty members at Vardhaman College of Engineering (Autonomous), Hyderabad: A Study,*ALibrary Philosophy and Practice*, pp.1-16.
- Wall, J. (2022). Information fluency - a framework for teacher librarians as expert practitioners, Informitt Journal, 36(1), pp. 15-23.
- https://unigug.ac.in